A ONE DAY WORKSHOP ON HOW TO SING POEM

मानेवारी २०१८ मुक्तविहार सातारा

सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाचा वारसा पुढे नेला पाहिजे : डॉ. सावंत

राष्ट्रीय काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात प्रतिपादन

लोणंद, दि. १४ (प्रतिनिधी) : साहित्यिक निर्माण करण्यासाठी ज्ञानेच भागात तसी व्यासपीठे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विवेकानंदांचे विचार तरुण पिढीपर्यंत पोहचवले पाहिजेत, संस्कार हे महत्त्वाचे आहात. त्यामुळेच माणूस जेंटलमन बनतो. त्यासाठी वैचारिक पातळी वाढवली पाहिजे आणि सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाचा वैचारिक वारसा पुढे नेला पाहिजे असे मत महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. नितीन सावंत यांनी व्यक्त केले. येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर आयोजित केलेल्या राष्ट्रीय काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. टी. एन. पोतदार होते.

शरदचंद्र पवार महाविद्यालयात काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटनवेळी बोलताना डॉ. नितिन सावंत. (छाया : सुरेश भोईटे)

पाहुणाच्या व्यक्तिमत्त्वविषयी बोलताना पुढे ते म्हणाले की, बोलणे आणि संस्काराचे महत्त्व जीवनात खूप आहे. एक चांगली पिढी घडेल आणि ती मोठी होऊन आम्हाला गुरुदक्षिणा देईल ती म्हणजे स्वतःचा सर्वांगीण विकास करा. जिजाऊ मॉसाहेबांनी महाराष्ट्रीच्या मातीत एक चांगला पुत्र घडवला. तसेच विज्ञानसुद्धा आपण त्यांच्या विचारांचे आचरण केले पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमास प्रमुख प्रा. डॉ. सुहास शिंदे म्हणाले की, 'आज चाकमिशनचीच शिक्षणात कमी होत आहे. एक चांगली पिढी घडेल आणि शाळेत तुच्छ लेखले जाते. पण कला शाखा ही सर्व व्यावसायिकतेचा पाया आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य टी. एन. पोतदार म्हणाले की, कलेची जोपासना केली पाहिजे त्यामुळे आनंद मिळतो. राष्ट्रीय मराठी काव्यवाचन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. त्यात प्रथम क्रमांक हौशेराव सर्जेराव हुबाळे बी. ए. भाग ३, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज पिंपळी बाच विद्यार्थ्यांनी मिळविला. द्वितीय क्रमांक सुमित शैभंत काळगे बी. ए. भाग २ छ शिवाजी कॉलेज सातारा व तृतीय क्रमांक उमेश राजेंद्र गोसावी मुधोजी कॉलेज फलटण यांनी मिळविला. त्यांना अनुक्रमे ५०००, ३००० व २००० रुपयांची पारितोषिके सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. रवींद्र कोकरे कथाकथनकार, विलास वि. कवलेकर यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभात परीक्षकांच्या हस्ते व प्रा. डी. ए. पाटील यांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त ऑडेली सातारा व विद्यार्थ्यांनी असलेल्या चिठ्ठीपत्रिकेचे संपादन केले व चिठ्ठीपत्रिकेचे प्रकाशन कवी संतोष पवार यांनी केले. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. सुरेश वाघमारे यांनी प्रास्ताविक केले व सह समन्वयक प्रा. सुखदेव भोसले यांनी आभार मानले.

पत्रकार रमेश धायगुडे, शशिकांत जाधव या पत्रकारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. मराठी विद्यार्थी पोपट धायगुडे यांचाही सत्कार करण्यात आला. प्रा. एम. डी. नाकाडे यांनी सूत्रसंचालन केले. १५ फेब्रुवारी शिवाजी अधिवेशन बळवंत कॉलेज विटा येथे होईल तेथील उद्घाटन समारंभासंबंधित विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ कोल्हापूर या संघाकडे गौरव करण्यात येणार आहे.